महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक ३००

जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/८१/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - १०/०३/२०२६

## अधिसुचना

, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असणारा रहिमतपुर - अंभेरी - वडुज - मायणी (प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ३८) या रस्त्याचे काम प्रगतीत आहे. रहिमतपुर पोलीस ठाणे हद्दीतील रहिमतपुर ते मायणी प्रजिमा-३८ या रस्त्यावरील मौजे रहिमतपुर शहरातील आदर्श शाळेला लागुन असणाऱ्या ओढ्यावरील असलेला जुना पुल पाडुन नवीन चौपदरी पुलाचे काम सुरु होणार असलेने सदर मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करुन पुलाचे काम पुर्ण करणे आवश्यक आहे. सदर पुलाचे काम पुर्ण होण्याकरीता सहा महिने कालावधी लागणार असलेने तोपर्यत नागरीकांची तसेच वाहनचालकांची गैरसोय होवु नये याकरीता सदर मार्गावरील वाहतूकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्या करीता पर्यायी मार्गाची उपलब्धता असलेने सदर मार्गावरील वाहतुक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये रहिमतपुर शहरातुन जाणाऱ्या रहिमतपुर ते मायणी प्रमुख जिल्हा महामार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतूक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. १२/०३/२०२६ चे ००.०१ ते ३१/०८/२०२६ चे २३.५९ वा. पर्यत खालील अधिसुचना पारित करीत आहे.

### वाहतुक मार्गातील बदलाबाबत

### वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. रहिमतपुर वरुन वडुज बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही रहिमतपुर - साप फाटा - साप गाव - अपशिंगे फाटा - अंभेरी वरुन वडुज कडे जाईल.
२. कोरेगाव वरुन वडुज बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही रहिमतपुर - साप फाटा - साप गाव - अपशिंगे फाटा - अंभेरी वरुन वडुज कडे जाईल.
३. वडुज वरुन रहिमतपुर कडे येणारी सर्व प्रकारची वाहतुक ही वडुज - अंभेरी - अपशिंगे फाटा - साप गाव - साप फाटा वरुन रहिमतपुर कडे जाईल.
४. वडुज वरुन कोरेगाव कडे येणारी सर्व प्रकारची वाहतुक ही वडुज - अंभेरी - अपशिंगे फाटा - साप गाव - साप फाटा - रहिमतपुर वरुन कोरेगाव कडे जाईल.

Scanned with CamScanner

५. रहिमतपुर ते वडुज जणारा रस्ता सुरु होण्याच्या ठिकाणापासुन ते आदर्श शाळा, रहिमतपूर पर्यत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करण्यात आला आहे.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक १०/०३/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(तुषार दोशी) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - १०/०३/२०२६
प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.
२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.
३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी
४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, सांगली, पुणे ग्रामीण
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.
५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.
९) मा.जिल्हाधिकारी सातारा.
१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner